निशुल्क असून, बाकीच्यांना सुद्धा अतिशय सवलतीच्या दरात ह्या सेवा उपलब्ध आहेत. सामाजिक तत्त्वावर चालणारे नर्सिंग केअर सेंटर ही संकल्पनाच मुळी मराठवाडा व आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांकरिता नवीन आहे. लोकांच्या मनात खूप शंका असायच्या. हे हॉस्पिटल आहे की वृद्धाश्रम आहे, असे प्रश्नचिन्ह असायचे. इथे राहणाऱ्या परावलंबी व्यक्तींना नैराश्याने ग्रासलेले असायचे. त्यातच जनसंपर्क नाही व बाहेरही जाता येत नाही. एकसुरी आयुष्यात तोचतोचपणा आला की, आणखी नैराश्य वाढते. त्यामुळे हा विचार करून आम्ही मानसिक आरोग्याच्या संवर्धनासाठी कार्यक्रमांची आखणी करत असतो. आपली भारतीय संस्कृती म्हणजे सणांची रेलचेल. त्यांचा आधार घेऊन प्रत्येक सण साजरा करणे व त्याकरिता स्थानिक लोकांना बोलावून कीर्तन, भजन, गायन सांस्कृतिक कार्यक्रम घेणे सुरु केले. ह्या उपक्रमांमुळे उत्साहाचे आनंदी वातावरण निर्माण होते.



**करील मनोरंजन जो ज्येष्ठांचे**
**जडेल नाते प्रभुशी तयाचे**

या उक्तीनुसार येथील रुग्णांचे मानसिक आरोग्य जपण्यासाठी त्यांच्या आयुष्यात सकारात्मकता निर्माण करण्यासाठी असंख्य लोक स्नेहसावलीशी जोडले गेले. ज्येष्ठ नागरिक आपल्या राष्ट्राची अनमोल संपत्ती आहे व त्यांच्याकरिता विरंगुळा केंद्राची सुरुवात करण्यात आली. ह्यात ज्येष्ठांना वय विसरून रमण्याचे, हसण्याचे व सकारात्मक ऊर्जा मिळण्याचे स्नेह सावली विरंगुळा केंद्र हे हक्काचे ठिकाण बनले. येथील प्रसन्न वातावरण, हवेशीर जागा ज्येष्ठांचा आत्मसन्मान जपणारा व प्रेमाने काळजी घेणारा कर्मचारी वर्ग ह्यामुळे येथील निवासी व्यक्तींच्या मनाला विरंगुळा व मायेचा ओलावा मिळत आहे. येथे हलकासा व्यायाम,पारंपरिक खेळ, स्पर्धा, चर्चासत्र, परिसंवाद, सामाजिक, सांस्कृतिक,बौद्धिक व मनोरंजनात्मक कार्यक्रम घेतले जातात. प्रत्येकाला छंद जोपासण्याची संधी मिळत आहे.

स्नेहसावलीतील परावलंबी लोकांमध्ये आव्हानात्मक आजार आढळून आला तो म्हणजे कंपवात अर्थात पार्किन्सन्स डिसीज. ह्या व्यक्तींचा सांभाळ कसा करावा व कर्मचाऱ्यांना त्याबाबत कसे प्रशिक्षण द्यावे, याबद्दल माहिती शोधताना मुंबई येथील पार्किन्सन डिसीज व मूव्हमेंट डिसऑर्डर सोसायटीच्या कंपवात आधार गटबद्दल माहिती मिळाली, व त्यांच्या सहकार्याने मराठवाडा विभागातील कंपवात रुग्णांकरिता पहिला मोफत आधार गट अर्थात सपोर्ट सेंटर स्नेहसावलीत सुरु झाले. ह्यात २२ रुग्ण नियमितपणे दर बुधवारी १ तास एकत्र येऊन तज्ज्ञ प्रशिक्षिताकडून ग्रुप थेरेपी घ्यायचे. ज्याचा दैनंदिन जीवनशैली सुधारण्याकरिता त्यांना फायदा होत आहे. त्यांचा व्यायामाचा भाग म्हणून सण साजरे करताना गरबा खेळणे, तोरण बनवणे असेही उपक्रम घेतल्यामुळे खेळीमेळीच्या वातावरणात ही बहुआयामी उपचार पद्धती वापरून कंपवाताच्या रुग्णाचे जीवन सुखकर व्हावे ह्या दिशेने चालू आहेत. तसेच वेगवेगळ्या आजारांबद्दल जनजागृती करण्यासाठी नेहमी कार्यक्रम घेतले जातात. कोरोना काळात संस्थेला अनेक संकटांचा सामना करावा लागला. पण त्यातूनही सहीसलामत बाहेर पडत पोस्ट कोविड केअर सेन्टर रोटरी क्लबच्या सहकार्याने सुरु झाले व त्याचा अनेक कोविड रुग्णांना उपयोग झाला. आजच्या घडीला ४५ परावलंबी व्यक्ती स्नेहसावलीमध्ये राहत असून, मराठवाडा व आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांकरिता हे दवाखाना व घर ह्यामधील दुवा साधणारे ठिकाण बनले आहे. कोणत्याही वयोगटातील कोणत्याही कारणाने परावलंबित्व आलेल्या व्यक्तीला इथे दाखल करून घेतले जाते. निराधार, परावलंबी व्यक्तींकरिता समाजातील दानशुर व्यक्तींच्या मदतीची थाप संस्थेच्या पाठीवर आहे. स्नेहसावलीशी अनेक साहित्यिक, कलाकार विविध क्षेत्रातील लोक जोडल्या गेले आहेत. नुकताच जिरिऍट्रिक सोसायटी ऑफ इंडियाकडून स्नेहसावलीच्या ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्य क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल गौरवण्यात आले आहे.

Scanned with OKEN Scanner